# प्रेस नोट

दिनांक ०९/०४/२०२१

| | |
|---|---|
| युनिट | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १. कु.सुषमा रामेश्वरराव येवतकर, वय—३२ वर्ष, व्यवसाय—नोकरी, पद—महिला पोलीस नाईक, ब.नं. १९३५, वर्ग ३, तैनाती—पोस्टे. नांदगांव खंडेश्वर, अमरावती ग्रामीण.<br>२. श्री.रविंद्र हरीनारायण बोन्द्रे, वय—३५ वर्ष, व्यवसाय—नोकरी, पद—पोलीस शिपाई, ब.नं. ९४०, वर्ग—३, तैनाती—पोस्टे.नांदगांव खंडेश्वर, अमरावती ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०००/—रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०००/—रु. |
| घटनास्थळ | पोस्टे.नांदगांव खंडेश्वर येथील दुयम अधिकारी यांचे कक्षाचे मागील बाजुस. |
| घटना ता. व वेळ | दि.०९/०४/२०२१ चे १४:२० वा. |

**थोडक्यात हकीकत** :— यातील तक्रारदाराविरुध्द पोस्टे.नांदगांव खंडेश्वर येथे भा.द.वि. कलम ३२४ अन्वये गुन्हा दाखल आहे पोस्टे.नांदगांव खंडेश्वर येथील लोकसेवक श्री.विवेक राणे, पोलीस कर्मचारी यांनी तक्रारदारास पोस्टेला बोलावुन त्यांना सदर गुन्ह्यात अटक न करण्यासाठी ५०००/—रु. लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो येथे दिली.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीप्रमाणे दि.०८/०४/२०२१ रोजीचे पडताळणीमध्ये श्री.राणे यांनी तक्रारदारास तक्रारदाराचा गुन्हा त्यांच्याकडे नसून पोस्टे.येथील श्रीमती येवतकर मॅडम यांचेकडे असून तक्रारदारास त्यांना भेटायला सांगितल्याने दि.०९/०४/२०२१ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये तक्रारदार आलोसे कु.येवतकर मॅडम यांना भेटायला गेले तेव्हा येवतकर मॅडम यांनी तक्रारदारास ४०००/—रु. लाचेची मागणी केली व आलोसे क्र.२ श्री.बोंद्रे यांनी सुध्दा तक्रारदारास येवतकर मॅडम यांच्या वतीने ४०००/—रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०००/—रु. स्विकारण्याचे मान्य करुन सापळा कारवाई दरम्यान आलोसे कु. येवतकर यांनी तक्रारदाराकडून ३०००/—रु. लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने कु.येवतकर यांना ताब्यात घेण्यात आले असून श्री.बोंद्रे हे फरार झाले असल्याने दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री.विशाल गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक श्री.अरुण सावंत, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संतोष वि.इंगळे, मपोहवा.माधुरी साबळे, नापोकॉ.प्रमोद धानोरकर, युवराज राठोड तसेच चालक पोहवा.अकबर हुसैन यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्र. — १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.

( संतोष वि.इंगळे )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती.

Scanned with CamScanner